# माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या

**Format of application for obtaining information under the Right to**

10रु. कोर्ट फी COURT FEE Rs.10 भारत INDIA दस रुपये TEN RUPEES

## अर्जाचा नमुना
## Application Form

प्रति,
To,
राज्य शासकीय माहिती अधिकारी, सह. संचालक नगररचना विभाग, मिरा भा.म.न. पालिका
The State Public Information Officer,

मिरा भा.म.न. पालिका-

जा.क्र. मीभा/7783/२०१८
दि : 15/6/18

१) अर्जदाराचे पूर्ण नांव : राजु भाल
Full name of the applicant

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : 502 बी अमिमल टॉवर - भाईंदर (प) ठाणे
Address

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील : मौजे भाईंदर सर्वे क्र. 350(14), 349(13), 348(12) - बालाजी नगर - या मध्ये प्रथम परवानगी पासून सीसी ओसी- पर्यंत दिलेली परवानगीची संपूर्ण नस्तिका मिळावी
Particulars of information required

(एक) माहितीचा विषय + मौजे भाईंदर सर्वे क्र. 350(14) 349(13), 348, ची संपूर्ण नस्तिका
Subject matter of information

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित असेल तो कालावधी # 1990 ते 2018 पर्यंत
The period to which the information relates.

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन $ —
Description of the information is required.

(चार) माहिती टपालाने मिळणे आवश्यक आहे किंवा स्वत: घेऊन जाणार आहात किंवा कसे
Whether information is required by post or in person. स्वतः

(जादा शुल्कामध्ये प्रत्यक्ष टपाल खर्चाचा समावेश होईल) —
(The actual postal charges shall be included in additional fees.)

(पाच) जर टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे. —
In case by post
(साध्या, नोंदणीकृत किंवा शीघ्र डाकने)
(Ordinary, Registered or Speed)

(४) अर्जदार, दारिद्रेरेषेखालील आहे किंवा असे : — होय / नाही.
Whether the applicant is below poverty line. (Yes/No)
(असल्यास, त्याच्या पुराव्यादाखल छायाप्रत जोडावी.)
(If Yes, attach the photocopy of the proof thereof)

दिनांक : 14 जून. 2018 ठिकाण : भाईंदर अर्जदाराची सही
Date Place Signature of the Applicant.

\+ विषय ठळक स्वरुपात दर्शविण्यात यावा. (जसे शासकीय जमीन देणे / सेवाविषयक बाब / लायसेन्स, इत्यादी)
Broad category of the subject to be indicated (such) as grant of Government land/Service matters/ Licenses, etc.)

\# ज्या कालावधीची माहिती आवश्यक असेल तो संबध कालावधी दर्शविण्यात यावा.
Relevant period for which information is required to be indicated.

$ आवश्यक असलेल्या माहितीचा विशेष तपशील दर्शविण्यात यावा.
Specific details of the information is required to be indicated.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

जा.क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/१९४३/२०१८-१९ दिनांक:- १९|६|१८

**केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५**

M.A. (Legal) 1806 V.P.

प्रति,

श्री. राजू शहा

502 बी, हरीमल टावर, भाईंदर (प.)

विषय - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत माहिती मिळणेबाबत.

संदर्भ - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला दि.14/06/2018 अर्ज. (जो या कार्यालयास आवक क्र. मा.अ./1143/18-19, दि.15/06/18 अन्वये प्राप्त)

महोदय,

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत प्राप्त आपल्या संदर्भित अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाचे अभिलेखाची पडताळणी करुन आपणास पुढीलप्रमाणे माहिती ही उपलब्ध करुन देणेत येत आहे.

मौजे भाईंदर, 14(350), 13(349) व 12(348) या जागेतील बालाजी नगर या गृहसंकुलनातील कागदपत्रांच्या छायाप्रतीची मागणी केली आहे. तद्अनुक्रमे आपणांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकामार्फत मौजे सर्व्हे क्र. व हिस्सा क्र. निहाय बांधकाम परवानगी दिली जाते व सदर तपशिलानिहाय या कार्यालयाचे अभिलेख संकलीत केले जातात सबब सदर प्रकरणी आपण हिस्सा क्रमांकाचा उल्लेख केलेला नसल्याने नेमक्या परवानगीचा बोध होत नाही. तसेच माहिती अधिकारी अधिनियम, 2005 चे कलम 6(1) नुसार उक्त अर्जात 1 विषय व 150 शब्दांच्या मर्यादते अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तथापि आपण आपल्या पत्रात एका पेक्षा जास्त विषयांची सबंधित माहिती अपेक्षिलेली असल्याने सदर नियमानुसार अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त माहितीने आपले समाधान न झाल्यास केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये आपणास प्रथम अपील हे श्री. हे. रा. ठाकूर, प्रथम अपीलीय अधिकारी तथा नगररचनाकार, नगररचना विभाग यांचेकडे सदरचे पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसांच्या आत दाखल करता येईल.

आपला,

(राजेंद्र पांगळ)
जन माहिती अधिकारी तथा
प्र. सहाय्यक नगररचनाकार
नगररचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

1143

10 रु. भारत COURT FEE TEN RUPEES INDIA Rs.10

## PROFORMA OF FIRST APPEAL UNDER SECTION 19(1) OF THE RIGHT TO INFORMATION ACT, 2005.

मिरा-भाईंदर महानगरपालिका I.D. No. ____
मुख्य कार्यालय, भाईंदर (for official use)
आ. क्र. प्र.क्र./1238/18-19
दाखल ता. 31/8/18

To

श्री हेमंत ठाकूर - सो
नगर रचनाकार -
मिरा भा. म. न. पालिका

(Name & address of the Senior Officer acting as First Appellate Authority).

सहाय्यक संचालक नगररचना
मि. भा. म. न. पा.

1. Name of the Applicant : राजू एच शाह
2. Address of the Applicant : 582/बी हमीरमल टावर स्टेशन रोड भाईंदर (प) ठाणे
3. Particulars of the Central/ State Public Information Officer:
   (a) Name : हेमंत ठाकूर - नगर रचनाकार
   (b) Address: नगररचना विभाग - मिरारोड -
4. Date of submission of application for seeking information :
5. Date on which 30/35/40 days from submission of application are over: —
6. Reasons for appeal:
   (Please indicate separately for each question)
   (a) No response received within the specified period:
   (b) Aggrieved by the response received within the specified period
   (c) Grounds for appeal
7. Last date for filing the appeal :
8. Particulars of Information
   (a) Information requested
   (b) Subject
   (c) Period

दि: 14/6/2018 रोजी माहिती अधिकार अधिनियम 2005 माहिती मिळण्याबाबत सह नगररचनाकार यांनी माझा पत्रात एक पेक्षा जास्त आहे विषया मुळे फेटाळली - परंतु माझे भाईंदर सर्वे क्र. 14 (350), 13 (349) व 12 (348) हि एकच मालकाची असल्यामुळे अनेक होऊ शकत नाही।

9. A fee of ____ for appeal has been deposited in ______ vide Receipt No. _____ Dated _________ (only if applicable)

[signature]
Signature of Appellant
E-mail address, if any
Tel. No. (office) 7400242772
(Residence)____________

Place Mira Road
Date 30/8/2018

Please attach :

(a) Copy of RTI application.
(b) Copy of the response received from CPIO with which the appellant is aggrieved.

मिरा भाईंदर म
नगररचना
स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के

भारतीय डाक
India Post
SP 4011010101 <401101>
GSTN No: 27AAAGT0114P1Z5
EM223994155IN

जा.क्र. मनपा/नर/माहिती अधिकार/प्रथम अपील/ ४९४८/२०१८-१९ दिनांकः- ०४/१०/२०१८

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५

M.A.(Legal) 2018 - HEARING LETTER.doc

**केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत प्रथम अपील अर्जाबाबत कलम 19(6) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार यांचेसमोर सुनावणी**

प्रति,
श्री. राजू शहा ------ **(अपीलकर्ता)**
502, बी, हरीमल टॉवर,
भाईंदर (प.)

विषय - केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये प्रथम अपील सुनावणीसाठी हजर रहाणेबाबत.

संदर्भ - 1) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत आपला जनमाहिती अधिकारी, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडेस केलेला दि.14/06/208 रोजीचा अर्ज.

2) जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी सहा. नगररचनाकार, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यालयाचे आपणास पत्र क्र. मनपा/नर/1143/2018-19, दि.11/07/2018 अन्वये दिलेले उत्तर.

3) केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये आपला दि.31/08/2018 रोजीचा प्रथम अपील अर्ज.

महोदय,

केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत संदर्भ क्र. 1 मध्ये नमुद अर्जान्वये आपण या कार्यालयाचे जनमाहिती अधिकारी तथा प्र. सहा. नगररचनाकार यांचेकडून माहिती अपेक्षिलेली होती व त्याअनुषंगाने त्यांनी संदर्भ क्र. 2 मध्ये नमुद पत्रान्वये आपणास माहिती कळविलेली आहे तथापि सदरच्या माहितीने आपले समाधान न झाल्याने आपण केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत कलम 19(1) अन्वये प्रथम अपील हे या कार्यालयास संदर्भ क्र. 3 मध्ये नमुद अर्जान्वये दाखल केलेले आहे.

त्याअनुषंगाने उपरोक्त अधिनियमाच्या कलम 19(1) अंतर्गत दाखल केलेल्या आपल्या प्रथम अपील अर्जा संदर्भात सुनावणी ही दि.20/10/2018 रोजी सकाळी 10.40 वाजता निम्नस्वाक्षरीधारक यांचे कार्यालयास आयोजित करण्यात आलेली आहे. तरी कृपया सदरच्या सुनावणीसाठी आपल्याकडील कागदपत्रांसह व लेखी माहिती द्यावयाची असल्यास त्यासह दि.20/10/2018 रोजी सकाळी 10.40 वाजता सुनावणीसाठी या कार्यालयात उपस्थित रहावे ही विनंती.

सदरच्या सुनावणीसाठी आपण उपस्थित राहिला नाहीत तर आपल्या अर्जावर आपल्या अनुपस्थितीत नियमानुसार उचित निर्णय घेणेत येईल याची नोंद घ्यावी.

आपला,

(हे.रा. ठाकूर)
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**नगररचनाकार**
**नगररचना विभाग, मिरा-भाईंदर महानगरपालिका**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

1) जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, नगररचना विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका
2) सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता नगररचना विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका

(१९)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)

M.A. (Legal) 2018 S. K. – APPEAL LETTER – FINAL(12)

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर**

**केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अंतर्गत प्रथम अपील**

श्री. राजू शहा …… अपिलार्थी

502, बी हरीमल टॉवर, भाईंदर (प.)

विरूध्द

1) श्री. केशव शिंदे

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार

मिरा भाईंदर महानगरपालिका

2) श्री. विकास परब …… प्रतिवादी

सहा. जन माहिती अधिकारी, नगररचना विभाग

मिरा भाईंदर महानगरपालिका

## - विवेचन -

श्री. राजू शहा यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत जन माहिती अधिकारी, नगररचना विभाग यांचेकडेस दि.14/06/2018 रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

" मौजे भाईंदर, स.क्र.350(14), 349(1) 348(12) या जागेसाठी देण्यात आलेल्या परवानगी बाबतची माहिती मिळणेबाबत."

अपिल दाखल करण्याची कारणे :-

संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी पत्र क्र. मनपा/नर/1143/2018-19 दि.11/07/2018 अन्वये संबंधीत अपिलार्थी यांना विहीत कालावधीत उपलब्ध करुन दिलेली माहिती समाधानकारक नसल्याने अपिलार्थी यांनी उपरोक्त अधिनियमाच्या कलम 19(1) अन्वये दि.30/08/2018 रोजीच्या अर्जान्वये (आवक क्र. प्रअ/238/2018-19, दि.31/08/2018) प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगररचनाकार यांचेकडेस प्रथम अपील दाखल केलेले आहे.

सुनावणीचा तपशिल :-

अपीलार्थी, जनमाहिती अधिकारी व सहा.जन माहिती अधिकारी, यांना प्रथम अपिल अर्जाचे अनुषंगाने सुनावणीस दि.20/10/2018 रोजी सकाळी 10.40 वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र. मिभा/मनपा/नर/4149/2018-19, दि.04/10/2018 अन्वये कळविण्यात आले होते. सदरच्या सुनावणीस अपिलार्थी हे उपस्थित आहेत. तथापि जनमाहिती अधिकारी हे अत्यावश्यक बैठकीसाठी कार्यालयाच्या बाहेर असल्याने सदरच्या सुनवाणीस उपस्थित नाहीत.

1) अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :- "माझ्या दि.14/06/2018 रोजीच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि.11/07/2018 रोजीच्या पत्रान्वये त्रोटक व अपूर्ण माहिती दिलेली आहे. तरी माझ्या उपरोक्त अर्जात नमुद जमीनीतील प्रस्तावाची संपूर्ण संचिका ही अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावी व अपेक्षिलेली कागदपत्रे ही तात्काळ विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावीत."

2) जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :- "जनमाहिती अधिकारी हे अत्यावश्यक बैठकीसाठी कार्यालयाच्या बाहेर असल्याने सदरच्या सुनावणीस उपस्थित नाहीत."

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगररचना विभाग**

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)**

M.A. (Legal) 2018 S. K. – APPEAL LETTER – FINAL(12)

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

- निर्णय -

1) अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियमा अंतर्गत दि.14/06/2018 रोजी केलेल्या अर्जात नमुद बांधकाम प्रस्तावाची संपूर्ण संचिका ही सदरचा निर्णय प्राप्त झाल्यापासून 10 दिवसांचे आंत अवलोकनासाठी विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी व अवलोकना अंती त्यांनी सदरच्या संचिकेतील अपेक्षिलेल्या कागदपत्रांच्या / नकाशांच्या छायाप्रती ह्या विनाशुल्क तात्काळ उपलब्ध करुन द्याव्यात.

2) सबब सदर अपिल निकाली काढणेत येत आहे.

3) सदर आदेशाविरूध्द उपरोक्त अधिनियमातील कलम 19(3) अन्वये दुसरे अपील करावयाचे असल्यास मा. राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, 5 वा मजला, दालन क्र .528, कोकण भवन, सी.बी.डी .बेलापूर, नवी मुंबई 400614 यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून 90 दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

जा.क्र. मनपा/नर/माहीती अधिकार/प्रथम अपील/४६२४/२०१८-१९
दि.२९/१०/2018

२९/१०/२०१८

(हे.रा. ठाकुर)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगररचनाकार
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित

1 श्री. राजू शहा
502, बी हरीमल टॉवर, भाईंदर (प.)

2. श्री. केशव शिंदे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार
मिरा भाईंदर महानगरपालिका

3. श्री. राजेंद्र पांगळ
सहा. जन माहिती अधिकारी, नगररचना विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका